# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिति,

कार्यपत्रिका क्र. ९

सभावृत्तांत

दिनांक ०९/१०/२०१५ दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१५ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०९/१०/२०१५ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. अरुण मदन टाक | सभापती |
| २. | मा. श्रीमती विमल रमेश काळे | सदस्या |
| ३. | मा. श्रीमती निता विलास पाडाळे | सदस्या |
| ४. | मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ५. | मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | सदस्या |
| ६. | मा. श्रीमती वैशाली राहुल जवळकर | सदस्या |
| ७. | मा. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

खालील प्रमाणे नामनिर्देशित सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री. पाडुळे शिवाजी तुकाराम

२. मा. श्री. सागर खंडू कोकणे

----------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रिय अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. डॉ. सतीश गोरे, पशु वैद्यकीय अधिकारी, मा. आव्हाळे एस. टी. लेखाधिकारी, मा. नितीन देशमुख, उपअभियंता विद्युत, मा. व्ही. के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. डी.एन. गायकवाड, उद्यान अधिक्षक, मा. विनय ओहोळ, मा. एल.बी. जाधव, उपअभियंता स्थापत्य, मा. राजेंद्र जावळे, मा. भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. अजय जाधव, मा.एस.एस. गायकवाड,मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. विश्वास गेंगजे. क्रीडा पर्यवेक्षक, मा. मा.बी.एम. मुलाणी, मा. ए.के. इदे, मा. जयवंत बी. रोकडे, कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा.पाडवी कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. पाडवी कनिष्ठ अभियंता, विद्युत, मा. डी. के. बैचे, हॉर्टी. सुपरवायझर, मा. जी.आर. गोसावी, सहा. उद्यान अधिक्षक, मा.सोनवणे ए.सी., मा. पाटील एस.ए., आरोग्य निरीक्षक मा. मोहन कदम, मा. एच. पी. सुभेदार, अतिक्रमण निरीक्षक, मा. अमर मद्रासी मलेरिया इन्सपेक्टर, इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सचिव, सभा शाखा** :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. ८ दिनांक १८/०९/२०१५ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील सभा कार्यपत्रिका क्र. ८ दिनांक १८/०९/२०१५ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ड प्रभाग समिती कार्यपत्रिका क्र. ९ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र. २६ विषय क्र. १
दिनांक : ०९ /१०/२०१५ विभाग : स्थापत्य विभाग

संदर्भ : मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. स्था /डक्षे/ कावि /९२४ /२०१५
दि. ३/१०/२ ०१५

ड क्षेत्रिय कार्यालयाचे स्थापत्य विभागाकडील सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील महसुली योजनेतील प्रभाग स्तरीय कामांच्या तरतुदीमध्ये संदर्भिय पत्रामध्ये नमूद केल्यानुसार वाढ/घट करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------------------

ठराव क्र. २७ विषय क्र. २
दिनांक : ०९ /१०/२०१५ विभाग : स्थापत्य विभाग

संदर्भ : मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. ड/ स्था / कावि /९२५ /२०१५
दि. ३/१०/२ ०१५

प्रभाग क्र. ४३ येथील जुन्या जिजामाता रुगणालयाच्या आवारामध्ये असलेल्या कर्मचारी निवासस्थानाच्या इमारती निष्कासित करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

--------------------------

मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने मागील महिन्याचे ड प्रभाग समिती सभेमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरुन सन्मा. सदस्यांनी खालीलप्रमाणे विविध विषयांवर त्यांचे मत व्यक्त केले.

**स्थापत्य विभागाचे कामकाजाबाबत चर्चा झाली**

**मा. कार्यकारी अभियंता श्री. ओंभासे** :- स्थापत्य विभागाकडून एकुण ५९ कामे करण्याचे प्रस्तावित आहे. त्यातील ११ कामांचे आदेश देणेत आलेले आहेत, १८ कामांच्या नस्ती सीलसाठी पाठविण्यात आल्या आहेत, २९ निविदा अद्याप उघडलेल्या नाहीत. काही कामांसाठी मुदतवाढ दोनवेळा देणेत आलेली आहे.

**मा. नीता पाडाळे** :- रस्त्यावर खड्डे पडले आहेत.

**मा. कार्यकारी अभियंता श्री. ओंभासे** :-डांबरीकरणाने खड्डे बुजविणेची कामे सुरु करणेत आलेली आहेत. दोन आठवडयांमध्ये खड्डे बुजविणेचे काम पूर्ण करणेत येईल.

**विद्युत विभागाचे कामकाजाबाबत चर्चा झाली.**

**मा. सभापती श्री. टाक :-** महापारेषण खात्याकडुन जी वीज घेतली जाते त्याचे बाबत बील अदायगी कशी करण्यात येते.

**मा. उपअभियंता(विद्युत)**:- महापारेषण खात्याकडून महापालिका जी वीज घेते त्यासाठी त्यांना बील अदायगी करण्यात येते. डी ब्लॉकमधील आलेल्या तांत्रिक दुरुस्तीकरीता महापारेषण खात्यास पत्र देणेत आले होते. त्यांचेकडून खोदकामासाठी परवानगी घेणेत आली नसल्याने त्यांचे काम बंद करण्यात आले होते. त्यांचेकडून आता कामास सुरुवात करणेत आलेली आहे.

**पाणीपुरवठा विभागाचे कामकाजाबाबत चर्चा झाली.**

**मा. वैशाली जवळकर** :- पाणीपुरवठा विभागाकडील मीटर निरीक्षक श्री.पावरा यांचे कामकाज व्यवस्थित नाही.

**मा. उपअभियंता श्री. जावळे** :- संबधितांना सक्त ताकीद देणेत येईल.

**अतिक्रमण विभागाचे कामकाजाबाबत चर्चा झाली.**

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव सभा शाखा :-** अतिक्रमण विभागाची कामाची वेळ दुपारी १ ते ९ अशी करण्यात आली असुन अतिक्रमण पथकाचे दोन गट करण्यात आले आहेत.

**मा. शिवाजी पाडुळे** :- बीआरटी मार्गावर सांगवी फाटा ते रक्षक चौक येथील मार्गिकेमध्ये टेंपो उभे केले जातात.

**मा. सचिव, सभा शाखा तथा प्रशासन अधिकारी** :- अतिक्रमण विभागाकडून वारंवार कारवाई करणेत येत असुन टेंपो मालकांवर दंडात्मक कारवाई करणेत येत आहे.

**पशूवैद्यकीय विभागाचे कामकाजाबाबत**

**मा. कैलासभाऊ थोपटे व मा. नीता पाडाळे** : मोकाट कुत्री व येथील डुकरांचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर आहे.

**मा. पशु वैद्यकीय अधिकारी** :- सध्या पशु वैद्यकीय विभागाकडून दोन टीम तयार करण्यात आल्या असुन एका टीमकडून पहाटेचे वेळी कार्यवाही करणेत येते तसेच दुस-या टीमकडून इन्सिडेंट बेसीसवर ज्या तक्रारी पशु वैद्यकीय विभागाकडे प्राप्त होतात त्यांचेवर कारवाई करणेची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. तसेच डुकरांचा प्रादुर्भाव कमी होणेकामी कुशल कामगार वर्ग उपलब्ध करुन घेणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. ज्या एजन्सींना पशु वैद्यकीय विभागाचे कामासाठी नियुक्त केले आहे त्यांचेबाबतची माहिती सर्व सन्मा. सदस्य यांना हवी असल्यास देण्यात येईल.

**आरोग्य विभागाचे कामकाजाबाबत**

**मा. नीता पाडाळे** :- कचरा गाडयांचे नियोजनात अद्यापही सुधारणा नाही.

**सहा. आरोग्याधिकारी** :- कचरा गाडीधारकांना कचरा गोळा करणेबाबत निर्देश दिलेले आहेत जर त्यांनी कचरा गोळा करण्याची कार्यवाही नीट पार पाडली नाही तर त्यांना दंड आकारणेत येईल अशा सूचना दिलेल्या आहेत.

**मा. वैशाली जवळकर** :- प्रभाग क्र. ५६ येथील कचराकुंडया साफ नाहीत. कचरा उचलला जात नाही.

**मा. राजेंद्र जगताप** :- प्रभाग क्र. ५६ व ५७ मधील कचरा सांगवी येथील कचरा संकलन केंद्रात टाकू देत नाहीत. प्रभाग क्र. ५७ येथील लोकसंख्या ७५००० इतकी आहे. कॉंपॅक्टर गाडया नादुरुस्त असतात.

**मा. शिवाजी पाडुळे** :- सांगवी परिसरातील कचरा ड प्रभाग हद्दीत टाकण्यात येतो.

**मा. सहा. आरोग्याधिकारी** :- कॉंपॅक्टर गाडया वारंवार बंद पडत असुन नवीन कॉंपॅक्टर खरेदीची कार्यवाही सुरु आहे.

**मा. क्षेत्रीय अधिकारी श्री. खोसे** :- सदर विषयास अनुसरुन क प्रभागाचे अधिका-यांसह चर्चा झाली आहे. सध्या बीव्हीजी इंडिया प्रा.लि. यांनी क प्रभागास ३ कॉंपॅक्टर दिलेले आहेत. क प्रभागाकडील प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात आला असून तीन कॉंपॅक्टर ड प्रभागाला मिळतील. तसेच जे कॉंपॅक्टर वारंवार बिघडत आहेत त्यांचे ऐवजी नवीन कॉंपॅक्टर मिळणेबाबत चर्चा झालेली आहे. नवीन अंदाजपत्रकात या कामासाठी तरतुद करण्यात येत असुन प्रत्येक प्रभागास एक कॉंपॅक्टर मिळणार आहे.

**मा. सभापती** :- सर्व उपस्थित सन्माननीय सदस्य व सर्व अधिकारी वर्ग यांचे आभार मानुन माहे ऑक्टोबर २०१५ ची बैठक संपलेचे जाहीर करतो.

सही/-

( अरुण मदन टाक )

**सभापती**

ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,

रहाटणी ४११०१७

सही/-

**प्रशासन अधिकारी तथा**

सचिव (सभाशाखा)

ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/१०८/२०१५

दिनांक – २०/१० /२०१५